आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र– दुपारी ३ वाजता

२४ नोव्हेंबर २०२२ – गुरूवार

**ठळक बातम्या**

- राज्यात पुराचं पाणी दुष्काळग्रस्त भागात वळवण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प सरकारनं तयार केला असून त्याकरता जागतिक बँकेनं अर्थसहाय्य करावं असं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- सीमाप्रश्नाबाबत कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांचं विधान निषेधार्ह असून याप्रकरणी केंद्रानं हस्तक्षेप करुन त्यांना आवरावं अशी विधानसभेतले विरोधी पक्ष नेते अजित पवार यांची मागणी

- कोविड-१९ काळातल्या परिस्थितीमुळे गोवर लसीकरणाकडे काहीसं दुर्लक्ष झाल्यानं, जागतिक स्तरावर गोवराचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका असल्याचा जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा

**आणि**

- ५५ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राचा पुरुष आणि महिला संघ अंतिम फेरीत

**<><><><>**

मराठवाडा आणि विदर्भ भागातल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच दुष्काळग्रस्त भागात पुराचं पाणी वळविण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनानं तयार केला असून त्यासाठी जागतिक बँकेने अर्थसहाय्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केलं.

जागतिक बँकेचे भारतातले प्रमुख ऑगस्टे तानो कौमे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामुले मराठवाडा आणि विदर्भातल्या सुमारे ५००० गावांना फायदा होत आहे. या प्रकल्पाला जागतिक बँकेचं सहाय्य लाभलं असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या यशस्वीतेनंतर दुसऱ्या टप्प्याला मान्यता देण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

<><><><>

सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात असताना कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत बेजबाबदार, प्रक्षोभक वक्तव्यं करणं निषेधार्ह असून हे महाराष्ट्र सहन करणार नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया विधानसभेतले विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिली आहे. जत आणि अक्कलकोट तालुक्यातल्या गावांवरचा दावा त्यांच्यासाठी 'खयाली पुलाव' ठरेल. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह सीमाभागातली ८१४ मराठीभाषक गावं महाराष्ट्रात येणं हा खरा मुद्दा आहे. ही गावं महाराष्ट्रात आल्यानंतरच संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न पूर्ण होणार आहे. या स्वप्नपूर्तीसाठी संपूर्ण महाराष्ट्र एकजुटीनं लढेल, असं पवार यांनी म्हटलं आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री भाजपाचे असून त्यांनी अशी वक्तव्यं तात्काळ थांबवावीत, केंद्र सरकारनं याप्रकरणात लक्ष घालून त्यांना आवरावं, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

<><><><>

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पदावरुन हटवण्याची मागणी, भारतीय जनता पक्षाचे खासदार उदयनराजे भोसले यांनी केली आहे. ते आज सातारा इथं वार्ताहरांशी बोलत होते. राज्यपाल कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज

यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावर आश्चर्य वाटत असल्याचं ते यावेळी म्हणाले. आदर्श भारताची संकल्पना मांडणाऱ्या शिवाजी महाराजांचे विचार जुने कसे, असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यासंदर्भात पत्रं लिहीलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

राज्यपाल ही एक संस्था असून तिच्या काही मर्यादा आणि बंधन असतात. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सगळ्या मर्यादा सोडल्या अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. त्या प्रकरणानंतर राज्यपालांनी छत्रपतींच कौतुक करणारं विधान केलं. मात्र, राज्यभरातून उमटलेल्या प्रतिक्रियांनंतर केलेलं हे विधान म्हणजे उशीराचं शहाणपण आहे, असं ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत म्हणाले. विविध विषयांवर त्यांनी यावेळी भाष्य केलं. तसेच राज्यपालांच्या या विधानाची दखल आता राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी घ्यावी. अशा व्यक्तीकडे राज्यपाल पदासारख्या जबाबदाऱ्या देणं योग्य नाही, असंही पवार म्हणाले.

<><><><>

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचं औचित्य साधून राज्यात राबवण्यात येणाऱ्या अमृत महा आवास अभियान २०२२-२३ चा प्रारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज मुंबईत होत आहे. महाआवास अभियान पुरस्कारांचं वितरणही यावेळी करण्यात येणार आहे. या अभियानामुळे पाच लाख गरीब, गरजू, बेघर आणि भूमिहीनांचं घरकुलाचं स्वप्न पूर्ण होणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. ३१ मार्च २०२३ पर्यंत हे अभियान राबवलं जाणार आहे.

<><><><>

केंद्र शासनाच्या उडान योजनेअंतर्गत बेळगाव-नाशिक-बेळगाव ही विमान सेवा येत्या ३फेब्रुवारीपासून पुन्हा सुरू होणार आहे. नाशिककरांसाठी सध्या स्पाईस जेटची नाशिक दिल्ली आणि नाशिक- हैदराबाद एवढीच सेवा सुरू आहे. गेल्या महिन्यात बेळगाव- नाशिक सेवा बंद झाली, तर दिल्ली- अहमदाबाद- नाशिक- पुणे- बेळगाव ही हॉपींग फ्लाईट १ नोव्हेंबरपासून बंद आहे. नाशिकचे माजी पालकमंत्री छगन भुजबळ यांनी यासंदर्भात केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांना पत्र पाठवून लक्ष घालण्याची मागणी केली होती.

<><><><>

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि पोलाद मंत्री जोतिरादित्य सिंधिया आज कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या समाधीला भेट दिली. छत्रपती शाहू महाराज यांचं कार्य प्रेरणादायी असून त्यांच्या स्मृती कायम स्मरणात राहतील असं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा – २०२१ या परीक्षेतल्या, राज्य कर निरीक्षकांच्या ६०९, आणि सहायक कक्ष अधिकाऱ्यांच्या १०० पदांसाठी सर्वसाधारण गुणवत्ता आणि तात्पुरती निवड याद्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं जाहीर केल्या आहेत. आयोगाच्या संकेतस्थळावर त्या प्रसिद्ध केल्या असून, त्याआधारे उमेदवारांकडून भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय मागवले जात आहेत. त्यसाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध आहे. ही वेबलिंक आजपासून येत्या ३० तारखेला रात्री ११ वाजून ५९ मिनिटांपर्यंत सुरु राहणार आहे, अस महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं कळवलं आहे.

<><><><>

कोविड-१९ काळातल्या परिस्थितीमुळे  गोवर लसीकरणाकडे काहीसं दुर्लक्ष झालं असून त्यामुळं  आता जागतिक स्तरावर गोवराचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण झाला असल्याचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेनं दिला आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि अमेरिकातील रोग नियंत्रण आणि प्रतिबंध विभागानं प्रसिद्ध केलेल्या संयुक्त अहवालात म्हटलंय की ,कोविड साथीमुळे गेल्या वर्षी सुमारे चार कोटी मुलांचा गोवर लशीचा डोस हुकला. जागतिक आरोग्य संघटनेचे गोवर विषयक तज्ज्ञ  पॅट्रिक ओ'कॉनर यांनी सांगितलं की,गोवराची लागण होण्याचं प्रमाण अद्याप गेल्या काही वर्षांच्या तुलनेत कमी आहे, त्यामुळे याबाबत ठोस कृती करण्याची हीच योग्य वेळ आहे. २०२१ मध्ये जगभरात गोवराचे अंदाजे ९० लाख रुग्ण आढळले, तर एक लाख २८ हजार जणांचा मृत्यू झाले. गोवराचा विषाणू हा सर्वात वेगानं संसर्ग पसरवणाऱ्या विषाणूंपैकी एक असला तरी लसीकरणाद्वारे त्याचा धोका टाळता येऊ शकतो. परंतु यासाठी ९५ टक्के लोकसंख्येचं लसीकरण आवश्यक आहे, असंही जागतिक आरोग्य संघटनेनं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

राज्यात कोविड १९च्या रुग्णसंख्येत लक्षणीय घट झाली असून मुंबईत उपचाराधीन रुग्णांची संख्या १००च्या खाली आली आहे. काल राज्यात ८९ नव्या रुग्णांची नोंद झाली, तर दीडशे रुग्ण बरे होऊन घरी गेले. काल कोरोनामुळे एकाही रुग्णाच्या मृत्यूची नोंद झालेली नाही.

राज्यात आतापर्यंत ८१ लाख ३५ हजार ३९८ जणांना कोरोनाची लागण झाली. त्यापैकी आतापर्यंत ७९ लाख ८६ हजार ३८० रुग्ण कोरोनामुक्त झाले तर १ लाख ४८ हजार ४०४ रुग्ण दगावले. सध्या राज्यात ६१४ रुग्णांवर उपचार सुरू आहे. त्यापैकी सर्वाधिक २४७ रुग्ण पुण्यात तर १०० रुग्ण ठाण्यात आहेत. राज्यात

रुग्ण बरे होण्याचा दर ९८ पूर्णांक १७ शतांश टक्के तर मृत्यू दर १ पूर्णांक ८२ शतांश टक्के आहे.

<><><><>

देशव्यापी कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत आज सकाळपासून ४६ हजारांपेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. त्यामुळे आतापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या २१९ कोटी ८८ लाखाच्या वर गेली आहे. त्यात २२ कोटी ११ लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे. राज्यात आज सकाळपासून २ हजारांपेक्षा जास्त नागरिकांचं लसीकरण झालं. राज्यात आत्तापर्यंत लाभार्थ्यांना दिलेल्या मात्रांची एकूण संख्या १७ कोटी ७५ लाखाच्या वर गेली आहे. त्यात ९४ लाख ३ हजारांपेक्षा जास्त नागरिकांनी खबरदारीची लसमात्रा घेतली आहे.

<><><><>

जलजीवन मिशन योजनेमुळं ग्रामीण भागातील महिलांना दिलासा मिळाला असून देशाच्या ग्रामीण भागात घरोघरी पाणी पोहोचवण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे, त्याचं ७० टक्के काम पूर्ण झालं असल्याची माहिती केंद्रीय जल शक्ती राज्य मंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी दिली आहे. महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातल्या खेड तालुक्यात पाईट गावासह इतर दोन गावांतील जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचा भूमिपूजन समारंभ राज्य मंत्री पटेल यांच्या हस्ते झाला त्यावेळी ते बोलत होते. या योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध असून प्रत्येक राज्यानं पुढे येऊन जल जीवन अभियानाच्या कामांना अधिक गती देण्याचं आवाहनही पटेल यांनी केलं.

<><><><>

राज्यात लम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याचं पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी सांगितलं. लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव परिस्थितीची पाहणी

करण्यासाठी केंद्र सरकारचं पथक राज्यात आलं आहे. रोग प्रादुर्भाव नियंत्रणासाठी माझा गोठा, स्वच्छ गोठा अभियान राबवण्यात येत आहे, गोधनास कळपामध्ये चरण्यासाठी पाठवणं आणि सार्वजनिक पाणवठ्यावर नेण्याच्या गावांमधल्या दोन्ही पद्धती, लम्पी चर्मरोग नियंत्रणात येईपर्यंत बंद ठेवण्याबाबत, गोपालकांमध्ये जागृती करण्यात येत असल्याचं, सिंह यांनी सांगितलं. राज्यात जवळपास ९८ टक्के जनावरांचं लसीकरण झाल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><>

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांची हाताळणी संवेदनशीलतेनं आणि तत्परतेनं करणार असल्याचं, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी म्हटलं आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते, अजित पवार आणि अंबादास दानवे यांनी काल गोऱ्हे यांची भेट घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न आणि स्त्रियांवरील अत्याचारांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन, सर्व विषयांवर संवेदनशीलतेनं आणि समन्वयाच्या भूमिकेतून मार्ग काढण्याचा दृष्टीनं या बैठकीत चर्चा झाल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या १९ डिसेंबरपासून नागपूर इथं होणार आहे.

<><><>

५५ व्या राष्ट्रीय खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला, अशा दोन्ही संघानी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीच्या पुरुष गटाच्या सामन्यात महाराष्ट्रानं कोल्हापूरला १९-१५ असं नमवलं. तर, महिला गटात महाराष्ट्रानं दिल्लीला १९-१० असं पराभूत केलं. अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या पुरुषांची भारतीय रेल्वे विरुध्द, तर महिलांची विमान प्राधिकरणाविरुध्द लढत होईल.

<><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत आजचा पहिला सामना जी गटाच्या स्वित्झर्लंड आणि कॅमेरूनदरम्यान दुपारी साडेतीन वाजता होणार आहे. एच गटात उरुग्वे चा सामना दक्षिण कोरियाशी संध्याकाळी साडेसहा वाजता आणि रात्री साडेनऊ वाजता पोर्तुगालचा सामना घाना सोबत होईल. जी गटाच्या ब्राझील आणि सर्बिया संघादरम्यान रात्री १२ वाजता शेवटचा सामना होईल.

<><><><>

राज्य सरकारच्या सूचनेनंतर मुंबई महापालिकेत कोरोना काळातल्या १२ हजार कोटी रुपयांच्या आर्थिक व्यवहाराचं लेखापरिक्षण, नियंत्रक आणि महालेखापाल - कॅगनं सुरु केलं आहे. एकूण पाच पथकं या कामासाठी तैनात आहेत. कॅगला पालिका प्रशासन सहकार्य करणार असल्याचं अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू यांनी सांगितलं. डिसेंबर अखेरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

<><><><>

जागतिक वारसा सप्ताहाच्या निमित्तानं उस्मानाबाद तालुक्यातल्या तेर इथं महाराष्ट्र शासनाचा पुरातत्त्व विभाग आणि उस्मानाबाद जिल्हा पर्यटन जनजागृती संस्था संचलित पर्यटन विकास समिती यांच्या वतीनं आज हेरिटेज वॉक घेण्यात आला. यामध्ये तेर इथला बौद्ध स्तूप, त्रिविक्रम मंदिर, रामलिंग आप्पा लामतुरे वस्तूसंग्रहालयातली विविध शिल्पं, पाण्यावर तरंगणारी वीट यासह, पुरातत्त्व खात्यानं केलेलं उत्खनन, याबद्दल माहिती देण्यात आली. हा ऐतिहासिक पुरातत्त्व वारसा जतन करण्यासाठी नागरिकांनी पुढे येण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलं.

<><><><>

सोलापूर जिल्ह्यातल्या टाकळी सिंकद इथल्या भिमा सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी विश्वराज माहाडिक तर उपाध्यक्षपदी सतीश जगताप यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर आज त्यांचा सत्कार

करण्यात आला. खासदार धनंजय महाडिक यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना न्याय देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करु असं आश्वासन, नवनिर्वाचित अध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी या सत्कारानंतर बोलताना दिलं.

**<><><><>**

अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यातल्या कोकणेवाडी ठाकर वसतीत राहणारी एक अपंग महिला आज पहाटे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात ठार झाली. ही महिला शेळ्यांच्या गोठ्यात झोपलेली असताना अचानक हल्ला करून बिबट्यानं तिला जंगलात फरफटत नेवून ठार केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. स्थानिक पोलीस आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटना स्थळाला भेट देऊन पंचनामा केला असल्याचं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

**<><><><>**

औरंगाबाद वाळूज औद्योगिक वसाहतीत आज सकाळी ट्रक आणि दुचाकीच्या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. कंपनीत कामासाठी जाणाऱ्या दोन बहिणींना त्यांचा भाऊ दुचाकीवरुन घेऊन जात असताना ट्रकनं धडक दिल्यानं तिघेही ट्रकच्या चाकाखाली चिरडले गेल्याचं, वाळूज एमआयडीसी पोलिसांनी सांगितलं.

**<><><><>**

सोलापूर जिल्ह्यातल्या अक्कलकोटहून आळंदकडे भरधाव वेगानं निघालेल्या एका कारनं शिरवळ इथं एका मालवाहू ट्रकला जोरदार धडक दिल्यानं काल झालेल्या अपघातात तीन जण ठार तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एका लहान मुलीचाही समावेश आहे. हा अपघात कार चालकाचा ताबा सुटल्यामुळं झाला असल्याचं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

***//<><><><><>//***